डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ६० /२०२६ दि. १४/०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभाग हददीत **नवीन आयरे रोड, डोंबिवली पुर्व येथील न्यु आयरे रोड, रेल्वे बोगदा ते राजाजी पथ** दरम्यानच्या रस्त्याचे कॉकिंटीकरणाचे काम दिनांक १६/०३/२०२६ रोजी पासुन करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतुक काम संपेपर्यत पुर्णपणे बंद करून पर्यायी मार्गाने वाहतुक खालील प्रमाणे अन्य मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	न्यु आयरे रोड, डोंबिवली पुर्व येथील रेल्वे बोगदा ते राजाजी पथ दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दोन्ही बाजुस **रेल्वे बोगदा व राजाजी पथ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**१)** दुचाकी, तिनचाकी व चारचाकी हलकी वाहने राजाजी पथ पासुन पुढे मढवी बंगल्यापासुन पुढे कोपर स्टेशन रोड, डोंबिवली पुर्व या पर्यायी मार्गाने दुतर्फा मार्गाने इच्छीत स्थळी जातील.
पर्यायी मार्ग –	**२)** दुचाकी व तिनचाकी वाहने जुना आयरे रोडने लक्ष्मण रेषा मार्ग आयरे गाव या पर्यायी मार्गाने ईच्छीत स्थळी जातील. **(सदर मार्गावर हलकी चारचाकी वाहने व जड अवजड वाहनांना यांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.)**
नो पार्कींगं–	**१)** जुना आयरे रोडने लक्ष्मण रेषा या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना २४ तास **नो पार्कींग** करण्यात येत आहे. **२)** रेल्वे बोगदा ते राजाजी पथ या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना २४ तास **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दिनांक १६/०३/२०२६ रोजी पासुन काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.